# संशोधन दृष्टिकोन व अभियोग्यता आणि महिला सक्षमीकरण: एक बहुविद्याशाखीय दृष्टीकोन

**श्री. विनोद गुलाबराव भामरे**
संशोधक विद्यार्थी
डी.ई.एस.शिक्षणशास्त्र महाविद्यालय धुळे व
संशोधन केंद्र- शिक्षणशास्त्र विभाग
कबचौउमवि, जळगाव.

**डॉ. संतोष काळूराम खिराडे**
सह मार्गदर्शक
शिक्षणशास्त्र विभाग
कबचौउमवि, जळगाव.

**डॉ. गजानन धनराज सपकाळ**
मार्गदर्शक
डी.ई.एस.शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
धुळे.

**सारांश :**

आज शैक्षणिक क्षेत्रात महिला शिक्षिकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. अध्यापनाचे कार्य महिला शिक्षिका उत्तमरीत्या करताहेत. दैनंदिन कामकाजात अर्थातच, विद्यार्थ्यांना शिकवत असतांना त्यांना कधी कधी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आधुनिक युगात तंत्रज्ञानाचे वारे वेगाने वाहत आहेत. नवनवीन तंत्रज्ञानाचा झपाट्याने शोध लागत आहे. अशा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपला वर्ग, तसेच आपल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल? या सर्व बाबींचा एक शिक्षिका नेहमीच सकारात्मक विचार करत असते. जर महिला शिक्षिकांमध्ये संशोधन दृष्टीकोन, संशोधन अभियोग्यता इत्यादी उत्तमरीत्या विकसित झाले तर खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण घडून येईल. त्यांच्यात संशोधन वृत्ती विकसित होणे ही काळाची गरज आहे. संशोधन हे केवळ माहिती गोळा करण्यापुरते मर्यादित नसून उपलब्ध तथ्यांच्या आधारे भक्कम पुरावे सादर करण्याची एक क्षमता आहे. म्हणून संशोधन क्षमता विकसित होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. जेव्हा शिक्षिका आपल्या वर्गातील आव्हानांवर मात करण्यासाठी पुराव्यावर आधारित निर्णय घेतात, तेव्हा त्यांच्या व्यावसायिक प्रगतीबरोबर आत्मविश्वास व जिज्ञासा वाढू शकते. संशोधन अभियोग्येमुळे त्यांची विचार करण्याची पद्धत वस्तुनिष्ठ होते. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात आणि शाळेत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या प्रश्नांचे तर्कनिष्ठ पद्धतीने त्या वैयक्तिकरित्या विश्लेषण करू शकतात. या व्यवसायात कार्यरत असणाऱ्या महिलांचा संशोधनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि संशोधन अभियोग्यतेचा सक्षमीकरणावर कसा परिणाम होतो, याचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तुत लेखात करण्यात आले आहे. महिला शिक्षिकांमध्ये संशोधक वृत्ती विकसित झाल्यास त्यांच्या निर्णयक्षमतेत, व्यावसायिक प्रगतीत काय आणि कसा परिणाम होतो, या सर्व बाबींचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तुत संशोधन लेखात करण्यात आलेले आहे.

**Keywords:** संशोधन दृष्टिकोन, संशोधन अभियोग्यता, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, महिला सक्षमीकरण, व्यावसायिक प्रगती.

**प्रस्तावना:**

मानवाच्या उत्क्रांतीच्या काळाचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि, शिक्षणामुळे मानव हा समृद्ध झालेला आहे. म्हणूनच मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन ठरले आहे. 21व्या शतकातील जागतिक ज्ञानव्यवस्थेत महिलांची भूमिका केवळ कौटुंबिकरित्या मर्यादित न राहता ती सार्वजनिक आणि व्यावसायिक क्षेत्रांत विखुरलेली आहे. शिक्षण क्षेत्र हे पारंपारिक काळापासून महिलांच्या सहभागासाठी अनुकूल मानले गेले आहे. परंतु, आधुनिक काळात सक्षमीकरणाची व्याख्या बदलली आहे. सक्षमीकरण म्हणजे केवळ अर्थार्जन किंवा सामाजिकदृष्ट्या प्रबळ करणे नव्हे, तर 'स्व'ची जाणीव होणे आणि स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होणे. युनेस्कोच्या अहवालानुसार, ङ्गमहिलांचे शिक्षण हे शाश्वत विकासाचे मुख्य सूत्र आहे.ङ्घ [१]

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतिराव फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. मुलींच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी संघर्ष केला. मुलींच्या शिक्षणासाठी त्यांना अधिकार मिळवून दिला. ज्ञानाचा दिवा घरोघरी लावला. आज प्राथमिक स्तरापासून अगदी उच्च शिक्षणापर्यंत महिला शिक्षिकांचे प्रमाण पुरुषांच्या बरोबरीने किंवा काही ठिकाणी त्यापेक्षाही जास्त आहे. मात्र, या महिला शिक्षिका 'व्यावसायिक'' म्हणून किती सक्षम आहेत, हा संशोधनाचा विषय आहे. केवळ वर्गात जाऊन अध्यापन करणे किंवा मुलांना शिकवणे हे सक्षमीकरणाचे प्राथमिक लक्षण असू शकते, मात्र विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि विकासासाठी तसेच विचारांच्या परिवर्तनासाठी अध्यापनाच्या पलीकडे जाणेही आवश्यक असते. खऱ्या अर्थाने सक्षमीकरण तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा महिला शिक्षिका ज्ञानाच्या निर्मात्या बनतील. त्यांच्यात सर्जनशीलता निर्माण होईल. त्यांच्यात चिकित्सक विचार निर्माण होतील. येथेच मसंशोधनफ ही संकल्पना केंद्रस्थानी येते.

संशोधन ही केवळ माहिती संकलित करण्याची प्रक्रिया नसून ती एक शास्त्रीय विचारप्रक्रिया आणि समस्या निराकरणाची पद्धत आहे. जेव्हा शिक्षिका संशोधक वृत्ती अंगीकारते, तेव्हा ती तिच्या

सभोवतालच्या समस्यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करू लागते.[२] महिलांचा संशोधनात्मक दृष्टिकोन त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचे प्रतीक असून, तो त्यांना चिकित्सक विचार करून स्वतः निर्णय घेण्यास सक्षम बनवतो. संशोधनामुळे व्यक्तीला पुराव्यावर आधारित बोलण्याची सवय लागते. यामुळे समाजात आणि कामाच्या ठिकाणी त्यांचा आत्मविश्वास वाढतो. अभ्यासानुसार, संशोधक वृत्ती असणाऱ्या महिलांमध्ये स्वावलंबनाची भावना अधिक प्रबळ असते.[३]

संशोधन अभियोग्यता ही संशोधनासाठी लागणारी कौशल्यपूर्ण क्षमता आहे. सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करणे, गृहीतके मांडणे आणि निष्कर्ष काढणे यांसारखी कौशल्ये जेव्हा महिला शिक्षिका आत्मसात करतात, तेव्हा त्यांचे व्यावसायिक सक्षमीकरण नक्कीच घडून येते. राष्ट्रीय शैक्षक धोरण 2020 मध्येही शिक्षकांना सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाचा भाग म्हणून संशोधनास प्रोत्साहित केले आहे.[४]

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये, महिला शिक्षिकांच्या या संशोधक वृत्तीचा बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून आढावा घेण्यात आला आहे. महिलांची घरगुती जबाबदारी, सामाजिक परिस्थिती आणि त्यांची संशोधनाविषयी असणारी आवड या सर्वांचा त्यांच्या सक्षमीकरणाशी कसा संबंध आहे, याचे सविस्तर विवेचन या लेखात केले आहे.

**संबंधित साहित्याचा आढावा:**

जागतिक स्तरावर महिला संशोधकांचे प्रमाण केवळ ३३.२५% आहे. जागतिक स्तरावर दर दशलक्ष रहिवाशांमागे असणारे संशोधकांचे अत्यल्प प्रमाण, विशेषतः महिलांची संख्या, हे शैक्षणिक क्षेत्रातील लिंगभेदाचे निर्देशक आहे.[५] महिला शिक्षिकांनी संशोधनाकडे वळणे ही केवळ वैयक्तिक प्रगती नसून, जागतिक आलेखात सुधारणा करण्यासाठी आवश्यक आहे.

क्रेसवेल आणि क्रेसवेल (२००९) यांनी त्यांच्या 'रिसर्च डिझाईन' या ग्रंथात स्पष्ट केले आहे की, संशोधन अभियोग्यता ही केवळ उपजत नसून ती योग्य प्रशिक्षण आणि सकारात्मक दृष्टिकोनातून विकसित केली जाऊ शकते. महिलांच्या बाबतीत, संशोधनामुळे महिलांमधील तार्किक विचार करण्याची क्षमता प्रबळ होते.[३]

प्रशाद आणि कासीम (२०२१) यांनी केलेल्या संशोधनात दिसून आले की, विज्ञान शाखेतील महिला संशोधकांमध्ये पुरुष संशोधकांच्या तुलनेत संशोधनाबाबत अधिक सकारात्मक दृष्टिकोन आहे. संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचारक्षमता विकसित होते, जी त्यांच्या व्यावसायिक कारकीर्दीत आणि वैयक्तिक-सामाजिक जीवनात अत्यंत उपयुक्त ठरते.[६] हे घटक अप्रत्यक्षपणे महिला शिक्षिकांच्या बौद्धिक सक्षमीकरणाला चालना देतात, असे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**संशोधनाचे उद्दिष्ट:**

संशोधन दृष्टिकोन आणि अभियोग्यतेचा शिक्षण क्षेत्रातील महिला सक्षमीकरणाशी असलेला परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती:**

माहितीचे संकलन आणि विवेचन करण्यासाठी मवर्णनात्मक व विश्लेषणात्मकफ पद्धतींचा अवलंब केला आहे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत:**

प्रस्तुत संशोधन लेख प्रामुख्याने दुय्यम माहितीवर आधारित असून, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्रातील प्रमाणित संदर्भ ग्रंथ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध, नियतकालिके, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अहवाल, युनेस्कोची प्रकाशने, इंटरनेटवरील विश्वासार्ह आणि अधिकृत शैक्षणिक संकेतस्थळे इ.साधनांचा यात संदर्भ घेण्यात आला आहे.

**विश्लेषण प्रक्रिया:**

संकलित माहितीचे बहुविद्याशाखीय दृष्टीकोनातून सामग्री विश्लेषण केले आहे. तसेच यामध्ये तार्किक निकषांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन दृष्टीकोन व संशोधन अभियोग्यता: एक विश्लेषण:**

महिला शिक्षिकांच्या सक्षमीकरणामध्ये 'संशोधन दृष्टीकोन' आणि 'संशोधन अभियोग्यता' हे केवळ शैक्षणिक गुण नसून महिला शिक्षिकांच्या व्यावसायिक आणि स्वतःच्या वैयक्तिक प्रगतीचे भक्कम आधारस्तंभ सुद्धा आहेत. ङ्गसंशोधन दृष्टिकोन म्हणजे केवळ माहिती मिळवणे नसून ती वैज्ञानिक अन्वेषणाची एक कला आहे. आणि ङ्गसंशोधन अभियोग्यता म्हणजे संशोधन प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यासाठी आवश्यक असलेली वैज्ञानिक समज आणि तांत्रिक कौशल्ये होयङ्क.[७] जेव्हा दृष्टिकोनाला अभियोग्यतेची जोड मिळते, तेव्हाच महिला शिक्षिका खऱ्या अर्थाने सक्षम होतात. खालीलप्रमाणे प्रमुख तीन घटकांनी अजून स्पष्ट करता येईल.

1) संशोधन दृष्टिकोनामुळे शिक्षिकेमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होते, तर संशोधन अभियोग्यतेमुळे समस्येचे निराकरण होण्यास मदत मिळते. समजा, एखादी शिक्षिका वर्गात अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांना शिकण्यात अडथळे येत असल्याची जाणीव तिला होते. संशोधन दृष्टिकोन असलेली शिक्षिका "हे अडथळे का येत आहेत?" असा विचार करेल. मात्र, संशोधन अभियोग्यता असलेली शिक्षिका या समस्या सोडवण्यासाठी योग्य संशोधन आराखडा तयार करेल. संशोधक दृष्टीकोन असलेली शिक्षिका या समस्यांकडे केवळ 'अडथळे' म्हणून न पाहता, त्यामागची मुळे शोधण्याचा प्रयत्न करते. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी गणितात सतत मागे का पडतो? याचे शिक्षिका स्वतः 'कृती संशोधन' करू शकतात. विद्यार्थी

गुणवत्तेत वाढ करू शकतात. "शिक्षकाची भूमिका मुलांना माहिती देणे नाही किंवा पारंपारिक पद्धतीने अध्यापन करणे नाही. प्रत्येक मूल शिकावे यासाठी नियोजन, व्यवस्थापन, आणि मुलांच्या शिकण्याचे नेतृत्व करणे आहे.[8]

2) संशोधन कार्यामुळे महिला शिक्षिकांमध्ये वस्तुनिष्ठता निर्माण होते. दैनंदिन जीवनात अनेकदा आपण पूर्वग्रहाने निर्णय घेतो, मात्र संशोधन वृत्ती असलेल्या शिक्षिका ह्या पुराव्यावर आधारित विचार करतात. आता संशोधन अभियोग्यतेच्या दृष्टीकोनातून विचार केला असता, अश्या शिक्षिका केवळ तथ्यांवर आधारित विचारच करत नाही, तर सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्याची तांत्रिक क्षमताही आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. स्वतःचे मत बाजूला ठेवून गोळा केलेल्या माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून निष्कर्ष काढतात. ही वस्तुनिष्ठता आणि विश्लेषण क्षमता त्यांना अधिक न्याय्य आणि अचूक निर्णय घेण्यास सक्षम बनवतात. हे खरे तर सक्षमीकरणाचे एक महत्त्वाचे लक्षण आहे.

3) सतत काहीतरी नवीन शिकण्याची ओढ म्हणजे जिज्ञासा. आधुनिक काळात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा (उदा.कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल टूल्स) वेगाने वापर होत आहे. संशोधक वृत्ती असलेली शिक्षिका या नवीन बदलांना घाबरत नाही. नवीन बदलांचे स्वागत करतात. नवीन बदल स्वीकारतात. संशोधन अभियोग्यतेमुळे हे नवीन तंत्रज्ञान नेमके कसे कार्य करते आणि ते वर्गात कसे वापरावे, हे आत्मसात करण्यास मदत होते. नवीन पद्धतींची माहिती असणे म्हणजे दृष्टिकोन. पण त्या पद्धती प्रत्यक्ष अध्यापनात प्रभावीपणे वापरून शैक्षणिक प्रयोग करणे ही त्यांची अभियोग्यता ठरते.

"महिला शिक्षिकांचा संशोधक दृष्टीकोन आणि संशोधन अभियोग्यता त्यांच्या सक्षमीकरणात कशा प्रकारे रूपांतरित होतात, यांचा संकल्पनात्मक आराखडा खालील आकृती 1 मध्ये दर्शवला आहे."




**आकृती 1: *संशोधनाद्वारे महिला सक्षमीकरणाचे संकल्पनात्मक प्रारूप***

**संशोधनाची गरज आणि महत्त्व:**

शिक्षण क्षेत्रात महिलांचे प्रमाण लक्षणीय असले, तरी संशोधनासारख्या उच्च बौद्धिक प्रक्रियेत त्यांचा सहभाग आजही तुलनेने मर्यादित दिसून येतो. 'ज्ञानाची निर्मिती' करणाऱ्या संशोधक शिक्षिका घडवणे ही काळाची गरज आहे. संशोधनामुळे महिलांची वैचारिक पातळी वाढते. संशोधनामुळे महिला शिक्षिकांच्या व्यावसायिक प्रतिष्ठेत कमालीचा बदल घडून येतो. तसेच संशोधन दृष्टीकोनातून पाहिल्यास त्यांच्या अध्यापनात सुद्धा बदल घडून येतो. त्या पारंपारिक पद्धतीने न शिकवता अत्याधुनिक पद्धतीने शिकवतांना आपल्याला दिसून येतील. यामुळे सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर नक्कीच होतांना आपल्याला दिसेल. महिला सक्षमीकरणाचा मुख्य गाभा म्हणजे 'स्वतंत्र निर्णयक्षमता'. संशोधनामुळे विकसित होणारी अभियोग्यता महिलांना पुराव्यांच्या आधारे विचार करण्यास प्रवृत्त करते. या वृत्तीमुळे शिक्षिका शैक्षणिक आव्हानांसोबतच खाजगी आणि सामाजिक जीवनातही आत्मविश्वासाने योग्य निर्णय घेण्यास सक्षम बनतात. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारा 'राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020' मध्ये शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी संशोधनाला केंद्रस्थान दिले आहे. शिक्षकाने सतत शिकत राहणे आणि संशोधक वृत्ती जोपासणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.[४] अशा वेळी महिला शिक्षिकांच्या संशोधन क्षेत्रातील अभिरूची आणि अडचणींचा अभ्यास करणे हे धोरणात्मक अंमलबजावणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**महिला सक्षमीकरणाचे बहुविद्याशाखीय विश्लेषण:**

सबंधित साहित्याचा आढावा व धोरणात्मक विचार करता, महिला शिक्षिकांचा संशोधन दृष्टिकोन व संशोधन अभियोग्यता हा

त्यांच्या सक्षमीकरणाचा मुख्य आधार असल्याचे स्पष्ट होते. याचे विश्लेषण पुढील प्रकारे करता येईल.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, सक्षमीकरण म्हणजे समाजात प्रचलित असलेल्या सत्तासंबंधांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे. पारंपारिक पितृसत्ताक पद्धतीत ज्ञानाची निर्मिती ही फक्त पुरुषांची मक्तेदारी मानली जात असे. मात्र, संशोधनामुळे आता महिला शिक्षिकेची ओळख केवळ 'अध्यापक' न राहता 'तज्ज्ञ' किंवा 'संशोधक' अशी झालेली आहे. जेव्हा महिला संशोधनात सक्रिय होतात, तेव्हा त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत लक्षणीय वाढ होते आणि त्यांची निर्णयक्षमता प्रबळ होते.[६] ही 'ओळख निर्मिती' महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण संशोधक म्हणून मिळणारी मान्यता त्यांना कुटुंबात आणि समाजात नक्कीच सन्मानाचे स्थान मिळवते.

मानसशास्त्रानुसार, संशोधन प्रक्रियेमुळे व्यक्तीच्या विचार करण्याच्या पद्धतीत मुलभूत बदल होतो. संशोधन अभियोग्यता विकसित झाल्यामुळे महिलांमध्ये 'स्व-कार्यक्षमता' निर्माण होते, अधिक प्रबळ होते. बांडुरा यांच्या मते, एखाद्या कठीण कामात मिळवलेले यश किंवा प्रभुत्व हे स्व-कार्यक्षमता वाढवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जेव्हा व्यक्ती आव्हानात्मक बौद्धिक कृती यशस्वीपणे पूर्ण होते, तेव्हा तिच्यातील व्यक्तिगत क्षमतेची खात्री बळकट होते. भविष्यातील संकटांना आणि अडथळयांना धैर्याने सामोरे जाऊ शकते.[१] संशोधनामुळे महिला संशोधकांमध्ये तार्किक विचारक्षमता विकसित होते. संशोधनामुळे महिला शिक्षिका केवळ भावनिक स्तरावर विचार न करता मपुराव्यावर आधारितफ निर्णय घेण्यास शिकतात. मानसिक सक्षमीकरण साध्य होण्यास मदत होते.[६]

शिक्षणशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिले असता, संशोधक शिक्षिका ही अधिक प्रभावी अध्यापक असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील मुद्दा क्र. 5.15 नुसार, शिक्षकांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी निरंतर विकास आवश्यक आहे. यामुळे संशोधक वृत्ती निर्माण होऊन खऱ्या अर्थाने शिक्षक सक्षम होतात.[४] या संदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे सखोल विश्लेषण केल्यास खालील बाबी स्पष्ट होतात.

1) नवीन धोरणानुसार शिक्षकांसाठी वर्षाला 50 तासांचा व्यावसायिक विकास बंधनकारक आहे. महिला शिक्षिकांनी या वेळेत 'संशोधन कार्यशाळा' आणि 'लेखन कौशल्य' विकसित केल्यास त्यांच्या व्यावसायिक गुणवत्तेत मोलाची भर पडेल.[4]
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मुद्दा क्र. 5.14 नुसार अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी जर नवनवीन पद्धती वापरल्या तर अशा शिक्षकांचा सन्मान करण्यात येईल.[4] म्हणून महिला शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात कृती संशोधन केल्यास शिक्षण व्यवस्थेत नक्कीच बदल घडून येईल. परिणामी त्या शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवणाऱ्या ठरतील.
3) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मुद्दा क्र.13.2 नुसार संशोधक शिक्षिका जेव्हा आपल्या वर्गात नवनवीन शैक्षणिक तंत्रज्ञान आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा प्रभावी वापर करतील तेव्हा नक्कीच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावेल, यामुळे अधिक चांगला अध्ययन अनुभव मिळेल.[4]
4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मुद्दा क्र.13.1 नुसार यशाचा सर्वात महत्वाचाघटक म्हणजे शिक्षकांची गुणवत्ता आणि त्यांचा सहभाग. संशोधक शिक्षिकेने आधुनिक तंत्रज्ञान आणि अध्यापन पद्धतींचा वापर केल्यास विद्यार्थ्यांची नक्कीच गुणवत्ता वाढेल.[4]

**महिला संशोधकांसमोरील आव्हाने:**


महिला शिक्षिकांना विविध सामाजिक आणि व्यावसायिक अडथळयांचा सामना करावा लागतो. या आव्हानांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

1) **दुहेरी जबाबदारीचे ओझे:** भारतीय समाज रचनेत महिलांवर घरगुती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे फार मोठे ओझे असते. महिला शिक्षिकांना संशोधनासाठी आवश्यक असलेला 'एकाग्र वेळ' मिळणे अत्यंत कठीण असतो. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे संशोधन कार्याला खूप कमी वेळ मिळतो. याचा परिणाम संशोधनाच्या गुणवत्तेवर होतो.
2) **विविध सुविधा आणि मार्गदर्शनाची कमतरता:** अनेक महिला शिक्षिकांना अद्ययावत ग्रंथालये, ई-जर्नल्स आणि तांत्रिक सॉफ्टवेअर्स वेळेवर उपलब्ध होत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षिकांना प्रगत संशोधन पद्धतींसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक न मिळाल्याने तांत्रिक बाबींसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते.
3) **तंत्रज्ञानाविषयी भीती:** आधुनिक संशोधन हे प्रामुख्याने माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित आहे. अनेक महिला शिक्षिकांना सांख्यिकी सॉफ्टवेअर्स (उदा. SPSS), माहिती संकलनाची डिजिटल साधने किंवा संगणकीय विश्लेषणाची कौशल्ये हाताळता येत नाहीत किंवा किंवा भीती दिसून येते. म्हणून ही भीती किंवा न्यूनगंड त्यांच्या संशोधन अभियोग्यतेत आणि प्रगतीत एक मोठा अडथळा ठरतो.

ISSN : 3107-8591
Vol. 1, Issue 2, Oct – Dec 2025

4) **व्यावसायिक मर्यादा:** अनेकदा शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधनासाठी योग्य वातावरण, पुरेसा निधी किंवा आवश्यक सवलती (उदा. संशोधन रजा) उपलब्ध नसतात. अध्यापनासाठी मिळणारा कमी वेळ, तसेच इतर अशैक्षणिक कामे आणि प्रशासकीय कामांमुळे संशोधनाकडे दुर्लक्ष होते.

"महिला संशोधकांसमोरील आव्हाने आणि त्या आव्हानांवर मात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या धोरणात्मक उपाययोजनांचे सविस्तर विश्लेषण खालील आकृती क्र. 2 मध्ये स्पष्ट केले आहे."



आकृती 2: *महिला संशोधकांसमोरील आव्हाने आणि उपाययोजनांचे विश्लेषण*

महिला संशोधकांसमोर असणारी आव्हाने सामाजिक, व्यावसायिक आणि तांत्रिक स्वरूपाची आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी बहुआयामी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या संदर्भात खालील उपाययोजना सुचवता येतील:

1) **तंत्रज्ञानविषयक प्रशिक्षण कार्यशाळा:** 'टेक्नो-फोबिया' किंवा तंत्रज्ञानविषयक भीती, चिंता इ. दूर करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयीन स्तरावर विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करावे. यामध्ये सांख्यिकी सॉफ्टवेअर्स, गुगल स्कॉलरचा वापर, ई-जर्नल्स शोधणे आणि संदर्भ व्यवस्थापन साधने (उदा. Zotero, Mendeley) यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दिले पाहिजे. तंत्रज्ञान साक्षरतेमुळे महिला संशोधकांचा आत्मविश्वास वाढून त्या जागतिक दर्जाचे संशोधन करू शकतील.
2) **मेंटरशिप आणि नेटवर्किंग:** महिला संशोधकांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांचे एक जाळे तयार करणे गरजेचे आहे. अनुभवी महिला संशोधकांनी नवीन संशोधक शिक्षिकांना मार्गदर्शन केल्यास त्यांना तांत्रिक आणि वैचारिक अडचणी सोडवणे सोपे जाईल. विद्यापीठ स्तरावर 'महिला संशोधन कक्ष' स्थापन करून तिथे चर्चासत्रे आणि नेटवर्किंग इव्हेंट्स आयोजित केल्यास विचारांची देवाणघेवाण होईल.
3) **कौटुंबिक आणि व्यावसायिक समन्वय:** महिलांच्या संशोधक वृत्तीसाठी कौटुंबिक पाठिंबा मोलाचा आहे. जबाबदाऱ्यांची योग्य विभागणी आणि संशोधनासाठी आवश्यक वेळ मिळाल्यास सामाजिक मानसिकतेत सकारात्मक बदल होईल. संशोधनाचे महत्त्व कुटुंबाने समजून घेतल्यास महिलांवरील ताण कमी होऊन त्या संशोधनात उत्तम योगदान देऊ शकतील.
4) **प्रकाशनासाठी आर्थिक मदत:** अनेकदा दर्जेदार जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्यासाठी मोठे शुल्क द्यावे लागते. आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी संस्थांनी किंवा शासनाने महिला संशोधकांना त्यांचे संशोधन जागतिक स्तरावर मांडण्यासाठी 'प्रकाशन अनुदान' उपलब्ध करून द्यावे.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून मशिक्षण क्षेत्रातील महिला सक्षमीकरणफ आणि मसंशोधनफ यांमधील अतूट संबंधाचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. अभ्यासाअंती असे स्पष्ट होते की, महिला सक्षमीकरण ही केवळ कागदोपत्री संकल्पना नसून, ती महिलांच्या वैचारिक प्रगल्भतेवर अवलंबून आहे. संशोधनामुळे महिला शिक्षिकांच्या विचार प्रक्रियेत तर्कशुद्धता आणि वस्तुनिष्ठता येते. जेव्हा त्या स्वतःची संशोधन अभियोग्यता विकसित करतात, तेव्हा त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संशोधक शिक्षिका ही केवळ माहिती देणारी नसून ज्ञानाची निर्मिती करणारी 'चिंतक' म्हणून ओळखली जाते. हा त्यांच्या व्यावसायिक सक्षमीकरणाचा महत्वाचा टप्पा आहे. संशोधनातील यश महिलांची 'स्व-कार्यक्षमता' वाढवते. हे सक्षमीकरण शाश्वत आहे, कारण संशोधक शिक्षिका स्वतःसोबतच आपल्या विद्यार्थ्यांमध्येही वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवतात.

थोडक्यात, महिला संशोधकांसमोर कौटुंबिक आणि संघटनात्मक आव्हाने असले तरी योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर 'संशोधन' हे महिला सक्षमीकरणाचे एक आधुनिक आणि प्रभावी शस्त्र ठरू शकते.

**संदर्भ सूची:**

1. UNESCO. (2020). Global Education Monitoring Report 2020: Inclusion and education: All means all. UNESCO, 34. : https://unesdoc.unesco.org/ark:/48223/pf0000373718
2. Best, J. W., & Kahn, J. V. (2006). Research in education (10th ed). PHI Learning.

3. Creswell, J. W. (2009). Research design: Qualitative, quantitative, and mixed methods approaches (3. ed., [Nachdr.]). SAGE Publ.
4. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020. (2020). शिक्षण मंत्रालय भारत सरकार.
   https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf
5. UNESCO. (2021). UNESCO Science Report: The Race Against Time for Smarter Development (p. 52). https://unesdoc.unesco.org/ark:/48223/pf0000377250
6. Prashad, N. M., & Qasim, S. H. (2021). Attitude Towards Research among the Research Scholars of Science and Arts Stream. X (10)(VII (7)), 737–744.
7. Kothari, C. R. (2004). Research Methodology: Methods and Techniques (2nd Revised Edition). New Age International Publishers.
8. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन वाचन साहित्य मुलभूत संकल्पना. (2023). राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
9. Bandura, A. (1977). Self-efficacy: Toward a Unifying Theory of Behavioral Change. Psychological Review, 84(2), 191–215. https://doi.org/10.1037/0033-295X.84.2.191


■■■